## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक श्री ज्ञानेश्वर सोनाजी गुळस्कर, वय ५३ वर्ष व्यवसाय - कनिष्ठ लिपीक, अभिलेख कक्ष, मा.मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद रा. बिल्डींग नं ३७/२२१, कोटला कॉलनी, शासकीय निवासस्थान, औरंगाबाद यांनी २,०००/- रु लाच स्विकारल्या नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक श्री ज्ञानेश्वर सोनाजी गुळस्कर, वय ५३ वर्ष व्यवसाय - कनिष्ठ लिपीक, अभिलेख कक्ष, मा.मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद रा. बिल्डींग नं ३७/२२१, कोटला कॉलनी, शासकीय निवासस्थान, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे वेदांतनगर, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्री गणेश धोक्रट, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | २,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | :- | मा.न्यायालयाकडुन निकाली लागलेल्या फौजदारी संचीका (मोस्टर) अभिलेख विभागात त्रुटी न काढता तात्काळ जमा करुन घेण्यासाठी |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,औरंगाबाद येथे नौकरीस आहे. तक्रारदार यांनी दिनांक ०३/०१/२०२० रोजी त्यांच्याकडील मा.न्यायालयाचे निकाली लागलेल्या फौजदारी संचीका (मोस्टर) अभिलेख कक्षात जमा करण्यासाठी श्री ज्ञानेश्वर सोनाजी गुळस्कर, कनिष्ठ लिपीक, अभिलेख कक्ष, मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, न्यायालय, औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद यांची भेट घेतली असता, त्यांनी मा.न्यायालयाकडुन निकाली लागलेल्या फौजदारी संचीका (मोस्टर) विभागात त्रुटी न काढता तात्काळ जमा करुन घेण्यासाठी २,०००/- रुपयाची मागणी केली होती. तक्रारदार यांना श्री ज्ञानेश्वर सोनाजी गुळस्कर, कनिष्ठ लिपीक, अभिलेख कक्ष, औरंगाबाद यांनी लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने श्री ज्ञानेश्वर सोनाजी गुळस्कर, कनिष्ठ लिपीक, अभिलेख कक्ष,औरंगाबाद यांची पंचासमक्ष लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कारणासाठी २,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून मा.न्यायालयाचे परवानगीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दिनांक ०४/०१/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, श्री ज्ञानेश्वर सोनाजी गुळस्कर, कनिष्ठ लिपीक,अभिलेख कक्ष,औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन २,०००/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे वेदांतनगर,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई करण्यासाठी पोलीस अधिक्षक डॉ.अरविंद चावरीया, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद, अपर पोलीस अधिक्षक डॉ.अनिता जमादार, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री गणेश धोक्रट यांनी कारवाई केली आहे. त्यांना पोना विजय बाम्हंदे, सुनिल पाटील, रवी आंबेकर, पोशि केदार, कंदे, कपिल गाडेकर व चालक पोशि चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-1)** sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.